शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जयवंत प्रतिष्ठान हुमगाव,संचलित

# **आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा**

ता. जावली, जि. सातारा

राष्ट्रीय सेवा योजना

## **निवासी विशेष शिबीर अहवाल**

**२०१९ – २०२०**

१. विशेष शिबिराचे ठिकाण - **पूरग्रस्त भागातील गाव जि.कोल्हापूर**

२. विशेष शिबीर दिनांक - **दि. २६/०८/२०१९ ते दि. ०१/०९/२०१९**

३. विशेष शिबिराची सहभागी स्वयंसेवक संख्या - एकूण :**४१** स्री – १४ ,पुरुष: २७

४. विशेष शिबिरात सहभागी शिक्षक संख्या – एकूण : ०३ स्री – ०१ , पुरुष : ०२

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत आयोजित कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात आलेल्या पूरग्रस्त भागातील गावात निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीर सोमवार दि.२६/०८/२०१९ ते रविवार दि.०१/०९/२०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास महाविद्यालयातील १४ स्वयंसेविका व २७ स्वयंसेवक,२ शिक्षक,०१ शिक्षिका असे एकूण ४४ स्वयंसेवक सहभागी झाले होते. त्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे -

**सोमवार दि.२६/०८/२०१९ :-**

पूरग्रस्त भागातील विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभागी होण्यासाठी सर्व स्वयंसेवक मेढा येथून सकाळी ८.३०वा. एसटी बस ने प्रवास करून दुपारी ३.००वा. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या ठिकाणी पोहचले. त्यानंतर विद्यापीठाच्या एम.पी.थिएटर येथील नियोजन कार्यक्रमात सहभागी झाले.

**मंगळवार दि.२७/०८/२०१९ :-**

या दिवशी सर्व स्वयंसेवक सकाळी ८.०० वा.विद्यापीठाच्या ग्राउंड वर उपस्थित राहिले त्यानंतर ठरलेल्या नियोजनानुसार एस.टी.बस ने प्रवास करून नृसिंहवाडी जि.सांगली येथे सकाळी ११.०० वा. पोहचले. नृसिंहवाडी या गावात पोहोचल्यानंतर तेथील सरपंच,उपसरपंच,ग्रामसेवक यांचेशी संपर्क साधून गावात स्वच्छता कामकाजास सुरुवात

केली.एस.टी. बस स्थानक शेजारील बाजारपेठेत व दुकानांसमोर साचलेला गाळ, कचरा गोळा करून तो दोन ते तीन ट्रोली मध्ये भरून दिला.त्यानंतर एस.टी.बस स्थानक परिसरात गाळ चार ट्रोलीत भरून दिला.नृसिंहवाडी गावातील एस.टी.बस स्थानक ते दत्त मंदिर रोड स्वच्छ केला,एस.टी.बस स्थानक शेजारील चौक ते डावीकडील बाजारपेठेतील स्वच्छता केली. तसेच बाजारपेठ ते दत्त मंदिर रोड स्वच्छता केली.बाजारपेठ ते सरपंचाचे घर (मेन रोड) पर्यंत स्वच्छता केली.

**बुधवार दि.२८/०८/२०१९:-**

या दिवशी सर्व ४१ स्वयंसेवकांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर परिसरातील विद्यार्थी भवन मधील उपहारगृह परिसर स्वच्छ केला. विद्यार्थी भवन मधील कार्यालयासमोरील बागपरिसर स्वच्छ केला. उपहारगृह समोरील गवत काढून झाडलोट केली तसेच विद्यार्थी भवन ते आरोग्य केंद्रापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने गटारातील गवत काढून स्वच्छता केली.मुलांच्या वस्तीगृहाच्या बागेतील गवत काढून लॉन करिता स्वच्छता केली.

**गुरुवार दि.२९/०८/२०१९:-**

या दिवशी सर्व स्वयंसेवकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘मन कि बात’ या कार्यक्रमांतर्गत लाईव्ह चीत्रफतीचा आस्वाद घेतला. फिट इंडिया दौड उपक्रमात सहभाग घेतला त्यानंतर एम.पी.थिएटर प्रवेश रोड ते अभ्यासकेंद्रापर्यंतचा रोड दोन्ही बाजूने गवत काढून स्वच्छ केला.

**शुक्रवार दि.३०/०८/२०१९ :-**

या दिवशी पंचगंगा नदी परिसर,नदीवरील घाट स्वच्छ केला. पंचगंगा नदी ते स्मशानभूमी रोड व स्मशानभूमी परिसर स्वच्छ केला.

**शनिवार दि.०१/०९/२०१९ :-**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत आयोजित कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात आलेल्या पूरग्रस्त भागातील गावात निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीर या शिबिराचा समारोप समारंभ संपन्न झाला. त्यानंतर सर्व स्वयंसेवक एस.टी.प्रवासाने दुपारी ४.०० वा. मेढा या ठिकाणी पोहचले.अशा प्रकारे शिबीर यशस्वी रित्या संपन्न झाले.